# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ / फाल्गुन २७, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | वने मंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | सामाजिक न्याय मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन मंत्री | |
| (८) | मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

---

### उमरेड (जि.नागपूर) तालुक्यातील स्टोन क्रशर खदान्यांमध्ये स्फोट होत असल्याबाबत

**(१) * ३०८१८ श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि.नागपूर) तालुक्यात ५० पेक्षा अधिक स्टोन क्रशर खदानी असून तेथे वारंवार स्फोट करण्यात येत असल्याने येथील नागरिकांचा जीव व मालमत्ता धोक्यात आली असल्याची बाब दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी स्फोटामुळे होणारे खड्डे तसेच सोडून दिले जात असल्यामुळे शेतकरी, कामगार, लहान मुले, वयोवृध्द आणि पशुधन यांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने याप्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) उमरेड तालुक्यातील स्टोन क्रशर/खदानी मध्ये ब्लास्टिंग होऊन नागरीकांचे जीव व मालमत्ता धोक्यात आल्याची अथवा हानी झाल्याची घटना दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी अथवा त्यादरम्यान घडलेली नाही.

(२) व (३) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या तरतुदीनुसार खाणपट्टा धारकांना उत्खनन परवानगी देतांना सिमांकनानुसार तारेचे कुंपण व आवश्यक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी आदेशित करण्यात येते. याबाबत तहसिलदार, उमरेड यांनी खाणपट्टाधारकांची सभा घेऊन जिवितहानी

होऊ नये याकरीता आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच याबाबत दिनांक १५ मे, २०२५ रोजी सर्व संबधित खाणपट्टाधारकांना पत्राद्वारे देखिल कळविण्यात आलेले आहे.

जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक ३० जून, २०२५ रोजी फ्लायॲशच्या वापराबाबत नागपूर जिल्ह्यातील कोराडी खापरखेडा औष्णीक विज प्रकल्पातून दररोज निघणाऱ्या अंदाजे १९००० मेट्रीक टन राखेच्या व्यवस्थापनाबाबत संबंधित अभियंता/अधिकारी यांची सभा घेऊन नागपूर व जिल्ह्यातील खाणपट्टाधारक यांना संचित राख विनामुल्य देवून बंद झालेल्या खाणींचे पुनर्भरण करणेबाबतचे निर्देश दिलेले आहेत. महसुल व वन विभाग शासन परिपत्रक दिनांक २९ जुलै, २०२५ व शासन पत्र दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ मध्ये नमुद तरतुदीनुसार नागपूर जिल्हयात बंद झालेल्या खदानींचे राखेव्दारे पुनर्भरण करून खाणी बंद करण्याबाबतचे काम सुरू करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मुलुंड येथील मुक्ता साळवे मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहात सुरु असलेला गैरव्यवहार**

**(२) * २८४८९ श्रीमती सई डहाके (कारंजा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड येथील मुक्ता साळवे मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहातील वॉर्डन व अन्य कार्यरत अधिकारी, कर्मचारी हे विनापरवाना येथील खोल्या व वसतिगृहाची जागा गोडाऊन म्हणून आसपासच्या व्यापाऱ्यांना परस्पर भाड्याने देत असल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हॉस्टेलचा कार्यभार बोरिवली येथील हॉस्टेलच्या महिला वॉर्डनकडे असून त्या नियमित मुलुंड येथील हॉस्टेलवर न येता तेथील कर्मचारी/अधिकारी यांच्या संगनमताने मनमानी पद्धतीने कारभार करीत असून एकूण २६ पैकी ११ खोल्यांमध्येच त्यांनी नियमानुसार प्रवेश दिला आहे व अन्य खोल्या व वसतिगृहाची जागा बेकायदेशीर गोडाऊन व अन्य खाजगी वापरासाठी भाडे आकारुन आर्थिक गैरव्यवहार करुन गरजू मुलींना डावलून शासनाची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार**

**(३) * ३०४९७ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेचे बांधकाम सन २०१३ पासून सुरु असून सन

२०१३ ते २०१६ पर्यंत एका ठेकेदाराने काम अर्धवट सोडल्याने सन २०१६ मध्ये दुसऱ्या ठेकेदाराकडे सदर काम देण्यात आले होते व ज्याची मुदत २०२३ पर्यंत होती, परंतु अद्यापही सदर काम पूर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १३ वर्षापासून जाणूनबुजून ठेकेदार व अधिकारी यांनी अनेक वेळा सुप्रमा (सुधारित प्रशासकीय मान्यता) मिळवून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामावर सुमारे ५ कोटी रुपये खर्च झाला असून काम वेळेत पूर्ण न केल्याने संबंधित ठेकेदारावर १३ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेच्या बांधकामात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेचे बांधकाम सन २०१३ ला सुरु करण्यात आले होते. मात्र ठेकेदाराने काम विहित मुदतीत न केल्याने करारनाम्यातील अटीनुसार दिनांक ५ जुलै, २०२३ रोजी मुळ ठेकेदाराकडून सदर काम काढण्यात आले व उर्वरित बांधकाम दुसऱ्या ठेकेदारामार्फत दिनांक ११ मार्च, २०२४ रोजी हाती घेऊन दिनांक २२ ऑक्टोबर, २०२४ मध्ये काम पुर्ण करण्यात आले असून सध्या शाळा इमारत वापरात आहे.
(२) सदर कामास फक्त एकदाच सन २०१८ मध्ये रु. ७०९.४८ लक्ष रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) व (४) सदर कामावर मूळ ठेकेदार यांनी केलेल्या बांधकामासाठी रु. ३९१.७७ लक्ष व त्यानंतर शाळा इमारतीच्या उर्वरित स्थापत्य व विद्युत बांधकामावर रु. २९१.३१ लक्ष असे एकूण रु. ६८३.०८ लक्ष एवढा खर्च झाला आहे.

तसेच मूळ ठेकेदाराने काम वेळेत न केल्याने रु. १६.४५ लक्ष एवढा दंड ठेकेदाराकडून आकारण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिवती (जि. चंद्रपूर) येथील शेणगाव वन उपक्षेत्रातून अवैध सागवानांची तस्करी होत असल्याबाबत

**(४) * २३४७४ श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिवती (जि.चंद्रपूर) येथील वनपरिक्षेत्रांतर्गत असलेल्या शेणगाव वन उपक्षेत्रातून वन विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने गत पाच ते सात महिन्यांपासून तेलंगणा राज्यात सागवानाची तस्करी सुरू असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैधरित्या सागवान लाकडाने भरलेला ट्रक तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेल्या चिखली खुर्द येथून बॅरिकेड तोडून पळाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जिवती (जि.चंद्रपूर) येथील वनपरिक्षेत्रातंर्गत शेणगाव वन उपक्षेत्रातून अवैध सागवानाची तस्करी करणाऱ्यांवर तसेच तस्करांशी संगनमत करणाऱ्या वन विभागातील संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

तथापी, दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजी जिवती वनपरिक्षेत्रातील वनकर्मचारी गस्त करीत असताना शेणगाव नियतक्षेत्रामध्ये लावारीस अवैध सागवान माल आढळून आला. त्याचा दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ अन्वये वनगुन्हा नोंदवून माल जप्त करण्यात आला आहे.

(२) दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ रोजी एका पिकअप वाहनाने चिखली खुर्द येथील अस्थायी तपासणी नाक्याचे लाकडी बॅरीकेट तोडुन गेल्याची घटना घडली. सदर घटना घडल्यावर संबंधीत अधिकारी/कर्मचारी मौकास्थळी पोहचुन आवश्यक कार्यवाही केली. तसेच पुढे तेलंगणा सीमेवरील केरामेरी येथे जाऊन तेथील वनकर्मचारी व पोलिस कर्मचारी यांची भेट घेऊन घडलेल्या घटनेबाबत माहिती देऊन प्रकरणाची चौकशी करण्यात आली.

(३) व (४) शेणगाव उपक्षेत्रातुन अवैध तस्करी करणाऱ्यांवर दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी वनगुन्हा जारी करुन २ इसमांना अटक करुन प्रकरण मा.प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, राजुरा यांचे न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे व इतर सहभागी आरोपी यांच्या विषयी CDR मागवून पुढील चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील मनरेगा अंतर्गत कुशल व अकुशल कामांच्या देयकांची प्रतिपूर्ती करण्याबाबत

**(५) * ३१०५२ डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भात विशेषतः गडचिरोली जिल्ह्यात गत तीन वर्षांमध्ये मनरेगा अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची देयके अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनरेगा अंतर्गत कुशल व अकुशल कामांच्या देयकांची प्रतिपूर्ती करण्यास विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विलंबामुळे लाभार्थी शेतकरी व शेतमजूर यांच्यावर ओढवलेले आर्थिक संकट दूर करून गडचिरोली जिल्ह्यातील गत तीन वर्षांची कुशल व अकुशल कामांच्या देयकांची प्रतिपूर्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

मनरेगा योजनेअंतर्गत गत तीन वर्षात अकुशल मजुरीकरीता रु.३७८.४७ कोटी व कुशल कामाकरीता रु.२३१.०४ कोटी असा एकूण रु.६०९.५१ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

अकुशल मजुरी रु.२१.५८ कोटी व कुशल कामाकरीता रु.९४.२८ कोटी असे एकूण रु. ११५.८६ कोटी निधी वितरणाच्या कार्यवाहीत आहेत.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या SNA Sparsh प्रणालीअंतर्गत नवीन FTO तयार करून कुशल देयकाच्या अदायगीची कार्यवाही सुरु आहे.

(३) आर्थिक वर्ष २०२५-२६ करीता केंद्रशासनाकडून रु.२२१७.५३ कोटी व राज्य शासनाकडून रु.७१९.३२ कोटी असा एकुण रु.२९३६.८५ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

तसेच केंद्र शासनाकडून अकुशल मजुरीकरीता रु. १४०९.०० कोटी प्राप्त झाले असून निधी वितरणाची बाब कार्यवाहीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हरसुल (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील वन जलस्त्रोतामधून अवैध वाळू उपसा करणारा ट्रक सोडण्यासाठी लाच घेतल्याबाबत**

**(६) * २९३३१ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हरसुल (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील वन जलस्त्रोतामधून अवैध वाळू उपसा करणारा ट्रक सोडून देण्याच्या मोबदल्यात ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपाल आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपाल यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) व.प.अ., हरसुल (प्रा.), पश्चिम भाग, नाशिक व वनपाल, पळशी यांच्याविरुद्ध ला.लु.प्र. विभाग, नाशिक यांनी दिनांक ३ जानेवारी, २०२६ रोजी हरसुल पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यामध्ये त्यांना अटक झाली आहे. व.प.अ., हरसुल (प्रा.) व वनपाल, पळशी यांना दिनांक ३ जानेवारी, २०२६ पासून निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्यावर म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियमातंर्गत विभागीय चौकशी सुरु करुन दोषारोपपत्र बजावण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लातूर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत कुशल कामांचा निधी प्रलंबित असल्याबाबत**

**(७) * ३११०० श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यात गत चार वर्षांपासून रोहयो अंतर्गत पूर्ण झालेल्या ८ हजार १६० कामांचे कुशल मजुरीचे १७४ कोटी रुपये अद्याप थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुशल कामांच्या मजुरीच्या देयकाबाबत शेतकरी जिल्हा परिषदेकडे वारंवार विचारणा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विहिरी, गोठे आणि शेतरस्त्यांची कामे स्वतः खर्च करून कामे पूर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांवर सावकारी कर्ज काढण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कुशल कामाचा निधी प्रलंबित राहिल्यामुळे नवीन कामे घेण्यासाठी कंत्राटदार आणि शेतकरी तयार होत नसल्याचे ग्रामीण भागातील 'मातोश्री शेतरस्ते' व 'फळबाग लागवड' यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांचे उद्दिष्ट साध्य करण्यास अडथळा येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त जिल्ह्यातील प्रलंबित १७४ कोटी रुपयांची कुशल कामांची देयके वितरित करण्याबाबत तसेच ज्या शेतकऱ्यांनी स्वखर्चाने कामे पूर्ण केली आहेत त्यांना थकीत रक्कमेवर व्याज देण्यासह केंद्राकडून निधी मिळण्यास विलंब होत असल्यास राज्य शासन निधी उपलब्ध करून देऊन नंतर केंद्राकडून त्याची प्रतिपूर्ती (Reimbursement) करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले :** (१) हे अंशत: खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत लातूर जिल्हयाकरीता सन २०२२-२३ ते आजतागायत अकुशल मजुरीकरीता ५०३.६० कोटी इतका निधी व कुशल कामांकरीता २७४.४५ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे.
लातूर जिल्हयातील विविध कुशल मजुरीच्या ६४७९ कामांचे रु.१२०.५६ कोटी देयके प्रलंबित आहेत

केंद्र शासनाच्या SNA Sparsh प्रणाली अंतर्गत नवीन FTO तयार करून कुशल देयकाच्या अदायगीची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

लातूर जिल्हयात सन २०२२-२३ ते आजतागायत सिंचन विहिरीकरीता अकुशल रु.२४०.०८ कोटी व कुशल रु.७५.४३ कोटी, जनावरांच्या गोठयाकरीता अकुशल रु.१४.१६ कोटी व कुशल रु.५९.२१ कोटी, सर्व प्रकारच्या रस्त्याच्या कामाकरीता अकुशल रु.९२.०० कोटी व कुशल रु.१०६.८६ कोटी अशी देयके अदा करण्यात आलेली आहेत.
(४) हे खरे नाही.

लातूर जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ७०८ अभिसरणांतर्गत मातोश्री रस्त्याची कामे प्रगतीपथावर असून फळबागेचे २७१० कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

आर्थिक वर्ष २०२५-२६ करीता केंद्रशासनाकडुन रु.२१७.५३ कोटी व राज्य शासनाकडून रु.७१९.३२ कोटी असा एकुण रु.२९३६.८५ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नवीन खाजगी दस्तनोंदणी कार्यालये सुरू करण्याबाबत

**(८) * २७८३८ श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवीन ६० खाजगी दस्तनोंदणी कार्यालये सुरू करण्याबाबत तीन कंपन्यांनी तयारी दर्शविली असून त्यांच्या प्रस्तावांची छाननी सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सर्पमित्रांना संरक्षण विमा व इतर शासकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(९) * ३१५९६ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्पमित्रांना वनविभागाकडे नोंदणी करणे आणि ओळखपत्र प्राप्त करणे बंधनकारक असूनही त्यांना शासकीय सुविधा किंवा संरक्षणाचा कोणताही लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरी वा ग्रामीण भागातील घरात किंवा वस्तीत साप निघाल्यास आपला जीव धोक्यात घालून सापांना जीवदान देण्याचे काम करणाऱ्या सर्पमित्रांना विमा संरक्षण व इतर शासकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी राज्यातील हजारो सर्पमित्रांकडून गेल्या अनेक वर्षापासून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्पमित्रांना विमा संरक्षण व इतर शासकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) राज्यात वन्य प्राण्यांच्या बचाव व पुनर्वसन कार्यासाठी स्वयंसेवी स्वरुपात कार्य करणाऱ्या सर्पमित्रांची स्थानिक स्तरावर नोंद ठेवली जाते. तथापि, सर्पमित्रांना शासकीय कर्मचारी किंवा अधिकृत सेवकाचा दर्जा देण्यात आलेला नाही.

वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत वन्य प्राण्यांचे संरक्षण, पकडणे, स्थलांतर करणे इत्यादी बाबी अधिकृत प्राधिकाऱ्यांमार्फतच करण्याची तरतूद आहे. स्वयंसेवकांना केवळ स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने कार्य करण्यास परवानगी दिली जाते.

काही स्वयंसेवी सर्पमित्र संघटनेकडून संरक्षण विमा व इतर सुविधांबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत. सदर निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्यात येत असून, सदर प्रकरणी संबंधित सर्व विभागांशी सल्लामसलत करून कायदेशीर चौकटीत राहून निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील बाह्यवळण रस्त्यामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्याबाबत**

**(१०) * २५१७३ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक कुंभमेळा बाह्यवळण राज्य मार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या असून त्यांना जमिनीचा योग्य मोबदला न दिल्यामुळे सदर रस्त्याच्या कामाविरोधात चिंचोली, वडगाव व पिंगळा येथील शेतकऱ्यांनी उपोषण सुरु केले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील चिंचोली फाटा ते पांढुर्ली या बाह्यवळण रस्त्यामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्त नागरिकांची अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेली घरे, विहिरी, गोठे, पॉलिहाऊस, कुपनलिका, दुकाने व झाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असल्यामुळे इतर गावाप्रमाणे चिंचोली व वडगाव पिंगळा येथील शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करून योग्य मोबदला देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नाशिक महापालिका ६६ किलोमीटर लांबीचा आणि ६० मीटर रुंदीचा रिंगरोड अर्थात सिंहस्थ परिक्रमा मार्ग तयार करणार असून रिंगरोडकरिता भूसंपादन प्रशासनाकडून पहिल्या टप्प्यात वडनेर दुमाला परिसरातील १८१ शेतकऱ्यांना नोटीस जारी केली असता मोबदल्याशिवाय जमीन देणार नसल्याची शेतकऱ्यांनी भूमिका घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने भूसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) शेतकऱ्यांनी याबाबत उपोषण केले ही बाब खरी आहे.

तथापि शासनाच्या दिनांक २५ मार्च, १९५७ च्या व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ शासन निर्णय दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ नुसार या ठिकाणी ३० मीटर रुंदीतच प्रस्तावित काम होत आहे त्यामुळे कामासाठी कोणतेही अतिरिक्त किंवा नव्याने भूसंपादन प्रस्तावित नाही.
(२) प्रस्तावित कामाअंतर्गत कामाचा वाव हा ५.५० मीटर डांबरी पृष्ठभागाचे १० मीटर रुंदीच्या डांबरी पृष्ठभागासाठी रुंदीकरण प्रस्तावित असून संपूर्ण कांम एकंदरीत बाजू पट्ट्या व गटारी सह रस्त्यांच्या मध्यापासून १० मीटर म्हणजेच एकूण २० मीटर रुंदीसाठी प्रस्तावित आहे. त्यामुळे चिंचोली ते पांढुर्ली हया बाहयवळण रस्त्याच्या लांबीमधील कोणत्याही शेतकऱ्याची घरे, विहिरी, गोठे, पॉलिहाऊस, कुपनलिका, दुकाने इत्यादीचे नुकसान होत नाही .तसेच प्रस्तावित कामे अस्तिवातील रस्त्याच्या ३० मी. रुंदीच्या आतच प्रस्तावित असल्याने नव्याने अतिरिक्त भूसंपादनाची आवश्यकता नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ यांचेमार्फत नाशिक परिक्रमा मार्ग (एकूण ६५.६० कि.मी.) हाती घेण्यात आले आहे. या प्रस्तावित नवीन (New Greenfield Alignment) रिंगरोडवरील खाजगी जमिनीचे भूसंपादन प्रस्तावित आहे.
(४) या रिंगरोडसाठी लागणा-या जमिनींचे भूसंपादन हे भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये करण्यात येणार आहे. तसेच, महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ नुसार शेतकऱ्यांना खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करण्याचा पर्याय ठेवण्यात आलेला आहे व त्या अनुषंगाने संबंधित शेतकऱ्यांकडुन संमतीपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ईश्वरपूर (जि.सांगली) येथील 'बॉम्बे रेयॉन' कंपनीत मैला टाकी स्वच्छ करण्यासाठी उतरलेल्या तीन कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(११) * २३८६० श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ईश्वरपूर (जि.सांगली) जवळील 'बॉम्बे रेयॉन' कंपनीत मैला टाकी स्वच्छ करण्यासाठी उतरलेल्या तीन कामगारांचा कार्बन डायऑक्साइड वायूमुळे गुदमरून मृत्यू झाला असून पाच कामगार जखमी झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालय आणि केंद्र सरकारने मानवी हाताने मैला साफ करण्याच्या (Manual Scavenging) कामावर पूर्णपणे बंदी घातली असतानाही या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असून माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये पिंपरी चिंचवड येथे कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी कंपन्यांकडून कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने न पुरवता तसेच कोणतीही पूर्वखबरदारी न घेता त्यांना जीवघेणे काम करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपनीविरुध्द कारवाई करण्यासह मैला स्वच्छतेच्या कामात आधुनिक मशिनरीचा वापर अनिवार्य करुन भविष्यात अशा घटना रोखणेबाबत तसेच आपतग्रस्तांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) प्रस्तुत प्रकरणी ईश्वरपुर पोलीस ठाणे येथे गु.रं.नं.३७/२०२६, दिनांक १७ जानेवारी, २०२६ अन्वये ड्रेनेज सफाई कॉन्ट्रक्टर विरुध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे. तसेच सदर प्रकरणी ३ सफाई कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून, त्यातील दोन पिडीत व्यक्तींच्या वारसांना कंपनीमार्फत प्रति व्यक्ती रु.१०.०० लक्ष प्रमाणे धनाकर्ष देण्यात आले असून एका पिडीत व्यक्तीच्या वारसदारास धनाकर्ष देण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासनाच्या दिनांक ५ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ३ मे, २०२४ च्या परिपत्रकान्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सेप्टीक टँक, भूमिगत गटारे इत्यादींची साफसफाई केवळ यांत्रिक पध्दतीने अथवा मशीन द्वारे करण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या असून केवळ अपरिहार्य परिस्थितीतच कामगारांमार्फत साफसफाई करण्यात यावी, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, शासनाच्या दिनांक ३० एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयान्वये दुषित गटारामध्ये काम करताना मृत्यु पावलेल्या/कायम अपंगत्व/अपंगत्व आलेल्या मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स/सफाई कामगारांना नुकसान भरपाई देण्यास मान्यता देण्यात आली असून नुकसान भरपाई अदा करण्यास सक्षम प्राधिकारी (जबाबदार अधिकारी) निश्चित करण्यात आले आहेत.

मैला स्वच्छतेच्या कामात आधुनिक मशिनरीच्या वापराच्या अनुषंगाने ''मॅनहोलकडून मशिनहोलकडे'' या योजनेंतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सक्शन कम जेटींग वाहने खरेदी करण्याची प्रक्रिया नगर विकास विभागाकडून सुरु असून सामाजिक न्याय विभागामार्फत वाहनयुक्त रोबोटीक स्वच्छता यंत्रे खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विशेषत: बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, परभणी व नाशिक जिल्हयात नैसर्गिक आपत्ती व रोगराईमुळे पिकांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(१२) * २३५३३ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात व विशेषत: बुलढाणा जिल्ह्यातील विविध भागात बदलत्या हवामानामुळे, अतिवृष्टी, ढगाळ वातावरण, आर्द्रता व रोगराईच्या प्रादुर्भावामुळे तुरीचे पीक मोठ्या प्रमाणात धोक्यात आले असून उत्पादनात लक्षणीय घट झाल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे कापूस व सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान होऊन आधीच कर्जबाजारी झालेल्या अनेक शेतकऱ्यांनी कपाशी व सोयाबीनसोबत आंतरपीक म्हणून तुरीची लागवड केली असून अति थंडी, धुके आणि ढगाळ, थंड-दमट वातावरणामुळे तूर, ज्वारी, गहू, मका, ज्वारी इ. रब्बी पिकांवर विविध अळयांचा व बुरशीजन्य रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊन रब्बी हंगामातील पिके धोक्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सेलू (जि.परभणी) तालुक्यातील कुपटा, गव्हा, गुंळखंड शिवारात शेतकऱ्यांच्या हळद पिकावर करप्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकांवर किडीचा व रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने पिके धोक्यात आली असून मका, गहू, कांदा आदी पिकांवर परिणाम होण्याची शक्यता असून अनेक शेतक-यांचा कापूस, कांदा अदयाप घरातच पडून असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त जिल्ह्यातील कुपटा, गव्हा, गुंळखंड तूर, ज्वारी, गहू, मका, ज्वारी पिकांवर विविध अळयांचा व बुरशीजन्य रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून याबाबत शेतकऱ्यांना तातडीने मदत, नुकसानभरपाई, पीक विमा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही,

(२) छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील काही तालुक्यांमध्ये तूर पीकावर मर रोग व ज्वारी पीकावर लष्करी अळी यांचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला होता.

तूर पीकाच्या शाखीय वाढीच्या काळात अतिवृष्टीमुळे अल्प प्रमाणात पीकाची वाढ खुंटली होती. परंतु फुले व शेंगा येणाऱ्या स्थितीत अनुकुल वातावरण असल्याने पीकाचे फारसे नुकसान झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे,

(३) परभणी जिल्हयातील केवळ सखल भागातील जमिनीत काही प्रमाणात आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या खाली हळदीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे.

(४) नाशिक जिल्हयातील काही भागात वातावरणातील बदलामुळे अल्प प्रमाणात कांदा पीकांचे शेंडे जळण्याचा प्रादुर्भाव दिसून आलेला होता. परंतु सद्यस्थितीत वातावरण निवळल्यामुळे पीक परिस्थिती चांगली आहे. तसेच मका व गहु पिकांवर कोणताही प्रादुर्भाव दिसून आलेला नाही, शेतकऱ्यांकडे कापूस, कांदा पीकांचे उत्पादन बाजार भावातील दरामुळे पारंपारिक पद्धतीने घरातच साठवणूक करून विक्री करण्याची पारंपरिक पद्धत असल्यामुळे कांदा व कापूस साठवणूक करून विक्री केला जातो,

(५) छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील शेतकऱ्यांकडून कुठलेही निवेदन अथवा तक्रार प्राप्त झालेली नसली तरी, हरभरा पीकावर काही प्रमाणात आढळून आलेल्या घाटे अळीच्या निर्मूलनासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत शेती शाळा, गाव बैठका, शास्त्रज्ञ भेटी, भित्तीपत्रके, घडी पत्रिकाद्वारे घाटे अळी नियंत्रणाबाबत प्रचार प्रसिध्दी तसेच उपाययोजना इत्यादीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले आहे.

नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज कृषी संकुल, मालेगाव यांच्यामार्फत जैविक बुरशी नाशके, ट्रायकोडर्मा मेटारायझम ही औषधे उपलब्ध करून दिल्यामुळे वेळीच पीक परिस्थिती आटोक्यात आणण्यात आली आहे.

परभणी जिल्हयाच्या बाबतीत आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या खाली हळद या पीकावर आढळून आलेल्या करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पीकावरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (Cropsap) अंतर्गत विविध उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

हळद हे पीक पीकविमा योजनेंतर्गत अधिसूचित पीक नाही.

बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नाशिक या जिल्ह्यांमधील जी पीके प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत अधिसूचित करण्यात आली आहेत आणि संबंधित शेतकऱ्यांनी विमा अर्जांव्दारे सहभाग घेतला आहे, अशा पीकांच्या बाबतीत पीक उत्पादनाची आकडेवारी आणि तांत्रिक उत्पादनाच्या आधारे पीक विमा पोर्टलच्या माध्यमातून नुकसान भरपाईच्या परिगणनेची कार्यवाही सुरु आहे,

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किनवट (जि.नांदेड) येथे भरतीपूर्व पोलीस प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र पूर्ववत सुरू करण्याबाबत

**(१३) * २८२१४ श्री.भीमराव केराम (किनवट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) येथे आदिवासी उमेदवारांसाठी भरतीपूर्व पोलीस प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले होते, परंतु कोरोना काळात सदर भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र बंद झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या पोलीस भरतीच्या जाहिराती आल्या असून भरतीसाठी अनुसूचित जमातीचे अनेक पात्र उमेदवार असून त्यांना कुठलेही प्रशिक्षण अथवा मार्गदर्शन न मिळाल्यामुळे शैक्षणिक व शारीरिक क्षमता असतानाही ते स्पर्धा करू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी युवक युवतींना नोकरीच्या संधी उपलब्ध होण्यासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन सुविधा मिळण्यासाठी युवक युवतींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार किनवट (जि.नांदेड) येथे भरतीपूर्व पोलीस प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र पूर्ववत सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) अंशतः खरे आहे.

(२) सर्वकष धोरणांतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत सन २०२४-२५ मध्ये सुमारे २२६३५ अनुसूचित जमातीच्या युवक-युवतींना पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेचा लाभ देण्यात आला. तसेच सन २०२५-२६ करीता राबविण्यात येणाऱ्या पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेकरीता लाभार्थी निवडी करीताची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर योजना ही शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१० नुसार राबविण्यात येत असून यामधील दर हे अत्यल्प असून सदर दरामध्ये वाढ करण्यासंदर्भात वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला असता वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले असून सदर मुद्यांच्या अनुषंगाने माहिती सादर करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्याबाबत

**(१४) * २७५५५ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या ४९७ आश्रमशाळेतील इयत्ता पहिली ते आठवीत ३२८७४ विद्यार्थी आणि इयत्ता ९ वी ते १२ वीत १६९१८ विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे पूर्ण होण्याकरिता तीन महिने शिल्लक असतानाही विद्यार्थ्यांना अद्याप गणवेश मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गणवेश खरेदीची निविदा प्रक्रिया न्यायालयीन वादात अडकल्यामुळे व प्रशासकीय विलंबामुळे सुमारे सहा महिन्यांचा कालावधी होऊनही राज्यातील हजारो विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहिले असून यामध्ये आदिवासी विकास आयुक्त, नाशिक यांनी विलंब केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शैक्षणिक वर्ष संपत असताना आता स्थानिक स्तरावर गणवेश खरेदीसाठी ११७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असला तरी अशा विलंबाने होणाऱ्या वाटपामुळे शासकीय निधीचा अपव्यय होत असून विद्यार्थ्यांची गैरसोय झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी विकास मंत्री यांनी आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांना तात्काळ गणवेश मिळावेत याकरिता थेट हस्तांतरण लाभ योजना (डीबीटी) द्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात येतील अशी घोषणा माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने या प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यांसह राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षाचे गणवेश विहित वेळेत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) आदिवासी विकास विभागांतर्गत सद्यस्थितीत ५०० शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून त्यामध्ये इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत एकुण २,०४,१७५ इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना एक शालेय गणवेश शालेय व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून मुख्याध्यापक स्तरावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) सन २०२५-२६ मध्ये सुधारीत खरेदी धोरणानुसार शालेय गणवेश पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र त्याविरुध्द उद्योग संचालनालयाने शालेय गणवेशासाठी दरनिश्चिती केलेल्या संस्थेने मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. १०३१८/२०२५ दाखल केली. याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिनांक २८ जुलै, २०२५ रोजी पुरवठा आदेश दिले नसतील तर पुढील सुनावणीपर्यंत देऊ नये असे निर्देश दिले. त्यामुळे निविदा प्रक्रियेतील प्राप्त न्युनतम दरधारकास वित्तीय मान्यता व पुरवठा आदेश देण्यात आले नाहीत. मात्र आता मा. उच्च न्यायालयाने दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या आदेशान्वये याचिकाकर्त्याची याचिका फेटाळली असल्याने न्युनतम दरधारकास दिनांक १० मार्च, २०२६ च्या आदेशान्वये वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) व (४) सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना दोन शालेय गणवेश देण्यात आले होते. मात्र सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात न्यायालयीन प्रकरणामुळे विद्यार्थ्यांना गणवेश देता येत नव्हते. शासकीय

आश्रमशाळेत नविन प्रवेशित विद्यार्थ्यांना किमान एक गणवेश मिळावा या उद्देशाने स्थानिक शालेय व्यवस्थापन समितीच्या माध्यमातुन मुख्याध्यापक स्तरावर एक गणवेश उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजीच्या आदेशान्वये रु. १,२१,८०,०००/- इतक्या रकमेस वित्तीय मान्यता देण्यात आली. त्यानुसार सन २०२५-२६ मधील नविन प्रवेशित विद्यार्थ्यांना एक शालेय गणवेश उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

(५) सन २०२५-२६ मध्ये विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया अंतिम करण्यात आली. मात्र यासंदर्भात दाखल याचिकेमध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या अंतरीम आदेशानुसार वित्तीय मान्यता व कार्यादेश देता आले नाहीत. आता दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या आदेशान्वये न्यायालयाने याचिकाकर्त्याची याचिका फेटाळली असल्याने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना विहित वेळेत गणवेश वाटप करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या अयोग्य नियोजनाबाबत

**(१५) * ३०९८२ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागाने नाशिकमध्ये माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये भरवलेल्या एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत नियोजनाअभावी निम्म्या खेळाडूंना स्पर्धेपूर्वी ट्रॅक सूट, टीशर्ट, स्पोर्ट शूज मिळाले नसल्याने विद्यार्थ्यांना उक्त साहित्याविना स्पर्धेत सहभागी व्हावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्पर्धेच्या नियोजनासाठी ठेकेदार कंपनीला १ कोटी ६० लाख रुपये देऊनही स्पर्धेच्या वेळी निम्म्याच खेळाडूंना क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्पर्धेसाठी राज्याचे आदिवासी विकास मंत्री तसेच आयुक्त उपस्थित असतांनाही खेळाडूना साध्या कपड्यांवर मैदानात उतरण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने आदिवासी विकास विभागाने नाशिकमध्ये माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये भरवलेल्या एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूलच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या नियोजनाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर व संबंधित जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) व (२) एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल मधील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ ते २ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. या स्पर्धेच्या आयोजनासाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे इव्हेंट मॅनेजमेंट संस्थेची निवड करण्यात आली होती. या स्पर्धेच्या आयोजनासाठी रु. १,६२,९९,९९९/- इतक्या रकमेस वित्तीय मान्यता देण्यात आली होती. सदर संस्थेस दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले.

त्यानुसार संस्थेने क्रीडा स्पर्धेच्या नियोजनासाठी स्टेज व्यवस्था, क्रीडांगण व्यवस्था, भोजन व्यवस्था, विद्यार्थी निवास व वाहतुक व्यवस्था, मेडल, ट्रॉफी व अनुषंगीक बाबींची स्पर्धेपुर्वी तयारी केली होती. मात्र क्रीडा गणवेश मधील टी-शर्ट व स्पोर्ट पॅन्ट, शुज, सॉक्स क्रिडास्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले ही वस्तुस्थिती आहे.

(३) होय.

(४) एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल मधील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजनासाठी निवड करण्यात आलेल्या इव्हेंट मॅनेजमेंट संस्थेने स्पर्धा आयोजनाच्या दृष्टीने सर्व व्यवस्था केली होती, साहित्य पुरविले होते मात्र स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या क्रीडा गणवेश मधील टी-शर्ट व स्पोर्ट पॅन्ट, शुज, सॉक्स क्रिडास्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी वाटप केले. त्यामुळे सदर संस्थेकडून कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीनुसार कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमध्ये कंत्राटी पर्यटन व्यवस्थापकाने वन्यजीव संरक्षण नियमांचे उल्लंघन केल्याबाबत

**(१६) * ३०७२५ श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमध्ये व्याघ्र प्रकल्पामधील कंत्राटी पर्यटन व्यवस्थापकाने फोटो आणि व्हिडिओ (रील) शूट केल्याने वन्यजीव संरक्षण नियमांचे उल्लंघन होत असून रिसॉर्ट आणि होम स्टे मालकांनी सदर कर्मचाऱ्याला हटवण्याची मागणी वनविभागाकडे माहे जानेवारी, २०२६ मध्ये केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी श्री.शिंदे यांनी कंत्राटी पर्यटन व्यवस्थापकाची चौकशी न करता तक्रार करणाऱ्या रिसॉर्टमालकांची उलटतपासणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटी पर्यटन व्यवस्थापकाविरुद्ध तसेच विभागीय वन अधिकारी यांच्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे कंत्राटी पर्यटन व्यवस्थापकाचे विरुध्द रिसॉर्ट/होमस्टे मालकांची तक्रार प्राप्त झाली असता विभागीय वन अधिकारी, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीनुसार उक्त तक्रारीत तथ्य नसल्याची बाब प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य यांनी कळविली आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रशासनामार्फत पर्यटन क्षेत्रात दिशादर्शक व सुचना दर्शक फलक लावण्यात आली असून आवश्यकतेनुसार पर्यटक मार्गदर्शकांमार्फत वेळोवेळी पर्यटकांना घ्यावयाच्या खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील व सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करून संबंधित शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत

**(१७) * २८३८३ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून शेतकऱ्यांना

शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानासाठी आवश्यक असलेल्या फार्मर आयडी, ई-केवायसी करताना अनेक तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे अनेक पात्र शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तहसील कार्यालयात फार्मर आयडीसाठी १०० ते २०० रु. घेऊन काम करणाऱ्या व्यक्ती मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याने ई-केवायसी झालेली असूनही शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, जमीन एकाची तर अनुदान दुसऱ्याच्या खात्यावर जमा, काहींनी जमीन नसतानाही बनावट फॉर्मर आयडी बनवून अतिवृष्टीचा निधी घेऊन गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील सुमारे १४ हजार शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढण्याचे काम अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच परभणी जिल्ह्यातील ७६ हजार शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी अद्यापही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील अनुदान वाटपातील अनियमिततेसंदर्भात संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह परभणी जिल्ह्यातील व सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करून संबंधित शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) अतिवृष्टी नुकसान भरपाईच्या याद्या ई पंचनामा पोर्टलवर अपलोड केल्या असता ज्या शेतकऱ्यांना डाटा फार्मर आयडी शी जुळला आहे अशा शेतकऱ्यांचे तात्काळ अनुदान त्यांच्या खात्यावर जमा झाले असुन ज्यांनी फार्मर आयडी नोंदणी केली नव्हती अशा शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण करुन घेण्यात आली व अशा शेतकऱ्यांना अनुदान रक्कम जमा होणेस तांत्रिक अडचण येत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

शेतकरी फार्मर आयडीची नोंदणी ही सीएससी केंद्रामार्फत करतात. ज्या शेतकऱ्यांचे आधार कार्ड वरील नाव व ७/१२ वरील नाव जुळते अशा शेतकऱ्यांना स्वयंचलित मंजुरी (Auto approval) मिळते. व ज्या शेतकऱ्यांचे आधार कार्डवरील नाव व ७/१२ वरील नाव जुळत नाही अशा शेतकऱ्यांची मंजुरी ही तपासुन फक्त तहसिलदार यांचे Face ID नेच होते. तसेच फार्मर आयडी बनवितांना शासनातर्फे सुरुवातीला PMKISAN डेटा उपलब्ध करुन देण्यात आला होता व तदनंतर ई- फेरफार प्रणालीवरील डेटा उपलब्ध करुन देण्यात आला होता. बनावट फार्मर आयडीची बाबतची बाब या कार्यालयाच्या निदर्शणास आलेली नाही.

सिल्लोड तालुक्यात एकूण ७८,१४३ नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांच्या अनुषंगाने ७४,७८३ शेतकऱ्यांचे फार्मर आयडी मंजूर झाले असून एकूण २,३२८ शेतकऱ्यांचे अर्ज प्रलंबित आहेत.
(४) व (५) सिल्लोड तालुक्यात एकूण ७८,१४३ नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांच्या अनुषंगाने ७४,७८३ शेतकऱ्यांचे फार्मर आयडी मंजूर झाले असून एकूण २,३२८ शेतकऱ्यांचे अर्ज प्रलंबित आहेत.सन २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये सिल्लोड तालुक्यातील ८२,२३५ शेतकऱ्यांचे ८१,०२४.१० हेक्टर पिकांचे नुकसान झाले आहे. या अनुषंगाने सदर नुकसान भरपाई शासन निर्णय सीएलइस-२०२५/प्र.क्र.६६५/म-३ (मदत-१), दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये हेक्टरी ८,५००/- रुपये तीन हेक्टर मर्यादित असुन त्याच शेतकऱ्यांना रब्बी हंगाम पेरणीसाठी बियाणे मदत म्हणुन १०,०००/- रुपये हेक्टरी देण्यात आलेले आहे. हे अनुदान वाटप करीत असतांना ज्या शेतकऱ्यांचा डेटा फार्मर आयडीशी जुळला आहे अशा शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान त्यांचे खात्यावर जमा झाले असुन ज्यांचा डेटा फार्मर आयडीशी जुळला नाही अशा शेतकऱ्यांना व ज्यांनी फार्मर आयडीची नोंद केली नाही

अशा शेतकऱ्यांची नावे तपासुन त्यांचे कडुन ई-केवायसी पूर्ण करुन घेण्यात येत असुन त्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होत असून यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता नाही.

परभणी जिल्ह्यातील तालुकानिहाय, गावनिहाय ज्या शेतक-यांनी अद्याप फार्मर आयडी काढलेला नाही त्यांच्या यादया सजानिहाय ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागावर लावण्यात आलेल्या असुन प्रलंबित खातेदार यांना ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत शेतकरी यांचे फार्मर आयडी काढणेकरीता सुचना देण्यात आल्या आहेत. परभणी जिल्ह्यातील प्रलंबित शेतकरी यांचे ओळख क्रमांक निर्मितीबाबत जिल्हास्तरावरुन सतत पाठपुरावा होत असुन क्षेत्रीय स्तरावर व्यापक मोहीम राबवुन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील वात्सल्य प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा चाबके तलावली संस्थेच्या संस्था प्रमुखांनी केलेला गैरव्यवहार

**(१८)** * **२९५६८ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील ज्ञानप्रबोधिनी शिक्षण संस्था कल्याण अंतर्गत वात्सल्य प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, चाबके तलावली या संस्थेच्या संस्था प्रमुखांनी केलेल्या गैरव्यवहार प्रकरणी त्यांचेवर फौजदारी कारवाई करुन संस्थेवर प्रशासक नियुक्त करुन आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेचे संस्था प्रमुख व मुख्याध्यापक हे कर्मचाऱ्यांना विनाकारण त्रास देऊन त्यांना बडतर्फ करीत असून संस्था प्रमुख यांनी बनावट देयके सादर करुन १००% विद्यार्थी पटसंख्या दाखवून अनुदानाचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेत बेकायदेशीररित्या मुख्याध्यापक नियुक्त करण्यात आले असून संस्था प्रमुखांनी बिंदुनामावली तसेच रोस्टरचा वापर न करता सरसकट आपले नातेवाईकांना संस्थेत नियुक्त केल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त आश्रमशाळेची मान्यता रद्द करून दोषी संस्था प्रमुखांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, खरे आहे.

(२), (३) व (४) सदर संस्थेच्या बाबतीत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच आश्रमशाळेतील माध्यमिक मुख्याध्यापक यांची माध्यमिक मुख्याध्यापक व माध्यमिक शिक्षक या पदावरील मान्यता अपर आयुक्त, ठाणे यांच्या दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आलेली आहे. तसेच याप्रकरणी सविस्तर चौकशी करुन व संस्थेला सुनावणीची संधी देऊन सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून आश्रमशाळेची मान्यता रद्द केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे मार्गाचे काम सुरु नसल्याबाबत

**(१९)** * **२९६८३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र सरकारने मंजूरी दिलेल्या पुणे, नाशिक रेल्वेमार्गाकरिता संपादित करावयाच्या जमिनीचे सर्वेक्षण करण्यात येऊन दोन वर्ष इतका कालावधी होऊनही अद्याप उक्त रेल्वेमार्गाचे काम सुरु करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेमार्गास मंजूरी देऊन त्याकरिता केंद्र व राज्य सरकारच्या हिश्याप्रमाणे एकुण किती निधी उपलब्ध केला आहे तसेच याकरिता अद्यापपर्यंत मार्गातील किती एकर जमीनीचे सर्वेक्षण केले आहे व त्यापैकी किती रुपये निधी बाधित शेतकऱ्यांना अदा केला आहे व किती बाधित शेतकऱ्यांना निधी अदा करणे बाकी आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त रेल्वेमार्गाचे काम सुरु करुन निश्चित कालावधीत पुर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) सदर प्रकल्पाच्या रु.१६०३९ कोटी खर्चाच्या अंदाजपत्रकास तसेच, या प्रकल्पाची उभारणी महारेलमार्फत ६०% (रु.९६२३ कोटी) कर्ज आणि ४०% (रु.६४१६ कोटी) समभागमुल्य या प्रमाणात राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या समभागमुल्यातील राज्य शासनाचा अर्धा हिस्सा रु.३२०८ कोटी (५०%) रक्कमेचे समभाग घेण्यास दिनांक १५ एप्रिल, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार, सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत राज्य शासनाने रु.१०००.६२ कोटी निधी वितरीत केला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या अहवालानुसार,संगमनेर तालुक्यातील खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने एकूण संपादीत करावयाचे क्षेत्र २२८.२०५ हे. आर. पैकी जिल्हास्तरीय समितीने १३२.०३ हे. आर क्षेत्राचा मोबदला निश्चित करुन दिलेला आहे. त्यापैकी १९.३५ हे.आर जमिन महारेल कंपनीने खरेदी केलेली असून त्यापोटी रु. २९.८९ कोटी इतका मोबदला संबंधीत खातेदार यांना अदा केलेला आहे.

तसेच, जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अहवालानुसार, सिन्नर तालुक्यातील १७ गावे व नाशिक तालुक्यातील ५ गावे अशी एकुण २२ गावे आरेखणात प्रस्तावित आहेत. त्यापैकी सिन्नर तालुक्यातील ४५.५१४३ हेक्टर इतकी जमिन रक्कम रु. ५७.२७ कोटी नुकसान भरपाई अदा करुन थेट खरेदीने महारेलने ताब्यात घेतली आहे.

तसेच, जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अहवालानुसार, पुणे जिल्हयातील खेड तालुक्यातील २१ पैकी ८ गावांची संयुक्त मोजणी पूर्ण होऊन जिल्हास्तरीय समितीत सदर गावांची मूल्यदर निश्चिती होऊन एकूण २७.६० कोटी रुपये शेतकऱ्यांना वाटप करून सध्या जमिनीचे थेट वाटाघाटीने खरेदी दस्त करण्यात आले आहे. तसेच, हवेली तालुक्यातील १२ पैकी ९ गावातील अंतिम मोबदला निश्चित होऊन ६ गावांमध्ये (अंशतः) खरेदीखत झालेले असून एकूण २०१,०७,६६,२०१/- रुपये शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले आहे. अशाप्रकारे पुणे जिल्ह्यात एकूण रु.२२८,६७,९४,८४१/- इतके वाटप करण्यात आले आहे.

महारेलकडून प्राप्त माहितीनुसार, सदर प्रकल्पाकरिता एकूण ९९.१८ हेक्टर जमीन संपादित केली असून, त्याकरिता रु.३१६ कोटी इतका खर्च झाला आहे.

(३) रेल्वे हा विषय केंद्रीय सुचीमध्ये समाविष्ट आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात नवीन रेल्वे मार्ग विकसित करण्याची प्राथमिक जबाबदारी ही रेल्वे मंत्रालयाची आहे.

केंद्र शासनाच्या रेल्वे विभागाने कळविल्यानुसार, महारेलने प्रस्तावित केलेल्या आरेखनामुळे जायन्ट मिटरवेव्ह रेडियो टेलिस्कोप (GMRT) ऑब्झर्व्हेटरीच्या अँटैनास व्यत्यय येत असल्यामुळे नॅशनल सेंटर फॉर रेडियो अॅस्ट्रोफिजिक्स (NCRA) यांचेकडून प्रकल्पाच्या आरेखनाला विरोध होत आहे. त्यामुळे रेल्वेबोर्डाने सदर प्रकल्प महारेलकडून राबविण्यास दिनांक २ जून, २०२० रोजी दिलेली प्राथमिक तत्वतः मान्यता काढून घेण्यात येत असून सदर प्रकल्पावर अधिक खर्च न करण्याची काळजी घेण्याबाबत महारेलला दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्प मध्य रेल्वेकडून राबविण्यात येत आहे.

सदर प्रकल्पाकरीता राज्य शासनाने आतापर्यंत वितरित केलेल्या रु.१०००.६२ कोटी निधीपैकी सदर प्रकल्पाच्या भूसंपादनाकरीता खर्च झालेला रु.३१६ कोटी निधी वगळता उर्वरित रु.६८४.६२ कोटी निधी राज्य शासनास परत करण्याची कार्यवाही करण्याबाबत व सदर प्रकल्पाकरीता संपादित केलेल्या जमिनीबाबतचा उचित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक २३ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये महारेलला कळविण्यात आले आहे.

मध्य रेल्वेने या प्रकल्पाचा सुधारित DPR दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी रेल्वे बोर्डाला सादर केला आहे. त्यानुसार प्रकल्पाची किंमत रु.१७८८९.२८ कोटी इतकी आहे. सुधारित संरेखन जीएमआरटी अँटैनाच्या सर्वात बाहेरील अँटैनापासून १२-१३ किमी अंतरावर आहे. त्यानुसार सुधारित DPR रेल्वे बोर्डाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकल्पाचा मूळ मार्ग बदलण्याच्या रेल्वे विभागाच्या निर्णयास विरोध दर्शविणारी व सदर रेल्वेमार्ग जुन्या सर्वेनुसार सिन्नर- संगमनेर- नारायणगाव-मंचर-राजगुरुनगर-चाकण- या मार्गाने होण्याची मागणी करणारी शासनास प्राप्त झालेली सर्व निवेदने महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई यांच्याकडे आवश्यक कार्यवाहीसाठी हस्तांतरित करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोखरांतर्गत मधुमक्षिका पालन योजनेत झालेला गैरव्यवहार

**(२०) * ३११२१ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील विविध गावांमध्ये सन २०१८ ते सन २०२४ या कालावधीत कृषी विभागाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोखरा अंतर्गत शेतकऱ्यांना व्यक्तिगत लाभ घटकांतर्गत मधुमक्षिका पालन अनुदान वितरित करण्यात आले असून तत्कालीन स्थानिक कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सदर बनावट योजना राबवून शासनाच्या लाखो रुपयाचे नुकसान केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाच्या जिल्हा समन्वयक समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी समिती सदस्यांच्या बैठकीत अनुदान घेणाऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर शासकीय अनुदान वसुली करण्याचा आदेश दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१८ ते सन २०२४ या कालावधीत तालुक्यांतील विविध गावात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोखरा अंतर्गत व्यक्तिगत लाभ घटकांतर्गत मधुमक्षिका पालन योजनेसाठी एका लाभार्थ्यांना १ लाख ६२ हजार रुपये असे २७ लाभार्थ्यांना थेट अनुदान देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय योजनेच्या नावाने गैरव्यवहार झाला असून तत्कालीन पैठण तालुका कृषी कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचारी यांनी लाभार्थी शेतकऱ्यांकडून योजना मंजूर करण्यासाठी पैसे घेतल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून संबंधित कर्मचाऱ्यांनी शासनाची फसवणूक करून शासकीय मधुमक्षिका पालन अनुदानाची रक्कम परस्पर घेतल्याचे शेतकऱ्यांनी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय, त्यानुसार नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोखराअंतर्गत मधुमक्षिका पालन योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित कृषी विभागाच्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही
(२) अंशत: खरे आहे. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा समन्वय समितीच्या बैठकीच्या दिनांक २४ जून, २०२४ च्या इतिवृत्तातील निर्देशानुसार मधुमक्षिका पालन या घटकाचे साहित्य जागेवर आढळून न आलेल्या शेतकऱ्यांकडून अनुदान वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.
प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टल द्वारे २७ शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर मधुमक्षिका पालन घटकाचे रक्कम रु.४३,५७,८००/-अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.
(४) मधुमक्षिका पालन लाभार्थी यांचेकडून पैसे घेतल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे.
(५) मधुमक्षिका पालन या घटकाबाबत प्राप्त इतर तक्रारींच्या अनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी वैजापूर यांच्या समिती मार्फत चौकशी पूर्ण होऊन त्यांच्या अहवालावरून विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर यांचे स्तरावरून २ सहायक कृषि अधिकारी यांचे विरूध्द म.ना.से. नियम ८/१२ अन्वये प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. उपविभागीय कृषि अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचेविरुद्ध म.ना.से. नियम ८/१२ अन्वये कार्यवाही करण्याचा प्रस्ताव कृषि आयुक्तालयास सादर करण्यात आला आहे. तसेच १ सेवानिवृत्त लेखाधिकारी यांचे विरूध्द म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम २७ अन्वये कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमेरिका-भारत व्यापार करारामुळे राज्यातील मत्स्यव्यवसायावर परिणाम होत असल्याबाबत**

**(२१)** * **३०९१६ श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमेरिका-भारत व्यापार करारामुळे राज्यातील मत्स्यव्यवसाय उद्योगावर परिणाम होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमेरिका व भारत व्यापार करारामध्ये $५०० बिलियन डॉलर अमेरिकेच्या उत्पादनावर ०% टैरिफ वर आयात करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असून राज्यातील मत्स्यव्यवसाय उद्योगावर त्याचा परिणाम होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याच्या मत्स्यव्यवसाय उत्पादनात होणाऱ्या नुकसानीबाबत शासनाकडून सहायता अनुदान देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमेरिकन मत्स्यव्यवसाय उत्पादनावर GST सह अन्य कर शासन लादणार आहे काय तसेच राज्यात किती टक्के मत्स्यव्यवसाय संबंधीत व्यापार होणार आहे, तसेच याबाबत शासनाने समिती गठित केली आहे काय व याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे :** (१) केंद्र सरकारच्या वाणिज्य विभागाच्या अखत्यारितील असलेल्या सागरी उत्पादन निर्यात विकास प्राधिकरण (MPEDA) या संस्थेकडून प्राप्त माहितीनुसार भारत व अमेरिका या देशादरम्यान व्यापार कराराबाबत वाटाघाटी सुरु आहेत. अमेरिकेकडून लादण्यात आलेल्या आयात शुल्काच्या वाढीमुळे राज्यातील मत्स्य व्यवसाय व समुद्री अन्न निर्यात उद्योगावर काही प्रमाणात परिणाम झालेला आहे. अमेरिकेने भारतीय समुद्री अन्न उत्पादनांवर लागू केलेल्या आयात शुल्कामुळे विशेषत: कोळंबी (Shrimp) निर्यातीवर परिणाम झाल्याची माहिती सागरी उत्पादन निर्यात विकास प्राधिकरण (MPEDA) कडून प्राप्त झाली आहे.

(२) व (३) अमेरिकेच्या उत्पादनावर आयात शुल्क लावण्याची बाब ही केंद्र सरकारशी संबंधित आहे. अमेरिकेकडून लादण्यात आलेल्या आयात शुल्काच्या वाढीमुळे मत्स्यव्यवसायात होणा-या संभाव्य नुकसानीबाबत, मत्स्य व्यवसायीकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत:-

- राज्यातील मत्स्य व्यवसाय व कोळंबी उत्पादकांना भेडसावणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजी कोकण विभागातील मत्स्य/कोळंबी उत्पादक व निर्यातदार यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये अमेरिकेकडून लादण्यात आलेल्या आयात शुल्काच्या वाढीमुळे होणा-या परिणामाबाबत सर्वंकक्ष विचारविनिमय करण्यात आला.
- तसेच, दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ रोजी ICAR-CIFE, वर्सोवा, मुंबई येथे भारतीय कृषि संशोधन परिषद, केंद्रिय खारे पाणी जलजीव पालन संस्था (ICAR-CIBA), चेन्नई, सागरी उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण (MPEDA), मत्स्य व्यवसाय विभाग व इतर संस्थांच्या समन्वयाने भागधारक सल्लामसलत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत सुमारे ७० शेतकरी, निर्यातदार व प्रक्रिया उद्योग प्रतिनिधींनी सहभाग घेतला.
- अमेरिकेकडून लादण्यात आलेल्या आयात शुल्काच्या वाढ़ीमुळे मत्स्यव्यवसायात होणा-या संभाव्य नुकसानीबाबत उपाययोजना करण्याच्या दृष्टीने देशांतर्गत मासळी बाजारपेठ बळकटीकरणास प्रोत्साहन देण्याचे नियोजन आहे.
- राज्य शासनाने मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेस शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०२६ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, या योजनेमार्फत भूजलाशयीन, निमखारे व सागरी क्षेत्रातील मत्स्यव्यवसायास चालना मिळणार आहे.

(४) केंद्र शासनाने मत्स्यव्यवसायाशी संबंधित उपकरणे व निविष्ठावरील GST दर १८% वरून ५% पर्यंत कमी केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यात बिबट्यांना मानवी वसाहतीत प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(२२) * २९२८६ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बिबट्यांना मानवी वसाहतीत प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी बिबट्यांचा अधिवास असलेल्या क्षेत्रात १ कोटीच्या शेळ्या-मेंढ्या सोडण्याबाबत वन विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेळ्या-मेंढ्या विकत घेऊन जंगलात सोडणे ही योजना कायमस्वरुपी व्यवहार्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या अधिवासात खाद्य मिळाले तर बिबटे मनुष्य आणि प्राण्यांवर हल्ले करणे थांबवतील, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बिबट्यांना मानवी वसाहतीत प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी व त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२) व (३) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत वन्य प्राण्यांचे संरक्षण, व्यवस्थापन व अधिवास संवर्धन याबाबत तरतुदी आहेत. सदर कायद्यात वन्य प्राण्यांच्या अधिवासात जाणीवपूर्वक पाळीव जनावरे सोडून त्यांना खाद्य उपलब्ध करून देण्याची तरतूद नाही.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या कलम ९ नुसार अनुसूचीतील वन्य प्राण्यांची शिकार करण्यास मनाई आहे. तसेच वन्य प्राण्यांच्या नैसर्गिक वर्तनात कृत्रिम हस्तक्षेप करणे ही व्यवस्थापनाच्या मूलभूत तत्वांना धरून नाही.

वन्य प्राण्यांचे वर्तन अनेक घटकांवर अवलंबून असते. अधिवासातील व्यत्यय, भक्ष्याची उपलब्धता, मानवी हस्तक्षेप इ. केवळ कृत्रिमरीत्या खाद्य उपलब्ध करून दिल्यास मानव-वन्यजीव संघर्ष पूर्णपणे थांबेल, असे कोणतेही वैज्ञानिक किंवा कायदेशीर अधिष्ठान उपलब्ध नाही.

(४) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतुदीनुसार पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• कलम ११ अंतर्गत मानव जीवनास गंभीर धोका निर्माण झाल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशाने पकडणे/स्थलांतर करणे.

• प्रशिक्षित पथकांमार्फत बिबट्यांना पकडून परिस्थितीनुरूप नैसर्गिक अधिवासात मुक्त करणे.

• अधिवास सुधारणा, नैसर्गिक भक्ष्यवाढ

• जनजागृती, तात्काळ प्रतिसाद पथके

• पिडीतांना त्वरीत आर्थिक सहाय्य देण्याची कार्यपध्दती इ.

वरील सर्व उपाययोजना कायद्याच्या चौकटीत व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविले जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे घोडबंदर (जि.ठाणे) येथील आदिवासींच्या जमिनीची बनावट पॉवर ऑफ ॲटर्नी करून फसवणूक केल्याबाबत**

**(२३) * २७९०२ श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घोडबंदर (जि.ठाणे) येथील आदिवासी जमीनधारकांची सुमारे ७,५४० चौ. मी. शासकीय नोंदणीकृत

जमीन भाईंदर येथील मेसर्स शांती कन्स्ट्रक्शन कंपनीच्या भागीदाराने मयत वारसदारांना जिवंत दाखवून बनावट पॉवर ऑफ ॲटर्नीद्वारे परस्पर नावावर करून फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीबाबत मूळ करारनामा व पूरक करारनामा जमीन मालकांनी कायदेशीर नोटीस देऊन रद्द केले असतानाही संबंधित बिल्डरने सदर करारांचा गैरवापर करून दस्तावेज नोंदणीकृत केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित बिल्डर, बनावट पॉवर ऑफ ॲटर्नी तयार करणारे तसेच अशा दस्तावेजांना मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) अशा प्रकारची वस्तुस्थिती निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जमातीच्या आदिवासी कोटयातून विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर करुन प्रवेश घेतल्याबाबत

**(२४) * ३१११० श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषध निर्माण यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमात अनुसूचित जमातीच्या (एसटी) कोटयातून ३२ विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर करून प्रवेश घेतल्याचे आदिवासी विकास विभागाच्या छाननीत माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त व्यावसायिक अभ्यासक्रमाना प्रवेश घेणाऱ्या १९ विद्यार्थ्यांकडे जात प्रमाणपत्रच नसल्याचे तसेच सदर जातवैधता प्रमाणपत्र तपासणी समितीच्या (Scrutiny Committee) नावाने किंवा बनावट स्वाक्षरीने तयार करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ३२ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची शिफारस राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाला (सीईटी सेल) केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह बनावट दाखले देण्यावर निर्बंध आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
अनुसूचित जमातीच्या आरक्षित जागेचा लाभ घेण्याकरीता ३७ विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे.
(४) खोटया / बनावट प्रमाणपत्राच्या आधारे व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले उमेदवार व संबंधित संस्था यांनी तात्काळ खुलासे सादर करण्याबाबत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (MH-CET) ने संबंधिताना

कळविले आहे. खुलासे प्राप्त झाल्यानंतर राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (MH-CET) कडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यासह गडचिरोली जिल्ह्यात निष्कृष्ट बियाण्यांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत

**(२५) * ३१५८६ डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेती उत्पादन वाढविण्याच्या उद्देशाने शासनामार्फत कृषी केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बियाण्यांचा पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनामार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या बियाण्यांची गुणवत्ता व विश्वसनीयता शासनस्तरावर तपासली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात निष्कृष्ट बियाण्यांच्या वापरामुळे शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट झाल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यासह गडचिरोली जिल्ह्यातील निष्कृष्ट बियाण्यांचे स्त्रोत तपासून संबंधित कंपन्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) व (२) होय.
(३) गडचिरोली जिल्ह्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या धान पिकांबाबत ७८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारी प्रामुख्याने धान पिक अपेक्षित कालावधीपेक्षा लवकर परिपक्व होणे आणि अन्य वाणाची भेसळ याबाबत होत्या. सदर तक्रारींमध्ये शेतकऱ्यांच्या उत्पादनात घट झाल्याबाबत तालुका तक्रार निवारण समितीने अहवालात नमूद केले आहे.
(४) गडचिरोली जिल्ह्यात तक्रार प्राप्त झालेल्या एकूण तीन कंपन्यांच्या पाच धान पीकांच्या वाणांच्या विक्रीस महाराष्ट्रात बंदी घातली आहे. राज्यात विनापरवाना निविष्ठा विक्री केल्याप्रकरणी एकूण रु.२.३४ कोटींचा १४.०३ मे. टन साठा जप्त केला आहे. एकूण ३७२ बियाणे विक्रेते परवाने निलंबित केले असून एकूण ५२० निविष्ठा विक्रेते परवाने रद्द केले आहेत. एकूण ८६८ निविष्ठा विक्रेते व कंपन्यांच्या मालास विक्री बंदीचे आदेश दिले आहेत. विविध कारणांमुळे कंपनी/विक्रेते/व्यक्ती यांचेवर एकूण ६५ पोलीस गुन्हे दाखल केले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.